पुण्यनगरी

21 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एनसीसी प्रशिक्षण अकादमीबाबत विद्यापीठ सकारात्मक

## कुलगुरू शिंदे

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :**
एनसीसी प्रशिक्षण अकादमी उभारण्याबाबत शिवाजी विद्यापीठ सकारात्मक असून, त्यासाठी आवश्यक कायदेशीर बाबी तपासून अधिकार मंडळासमोर त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी दिली.

एनसीसीचे महाराष्ट्र राज्याचे उप-महासंचालक ब्रिगेडियर अरुण हारगे (मुंबई), कर्नल चंद्रशेखर देशपांडे, मेजर डॉ. रूपा शहा यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरूंनी एनसीसीच्या राज्यस्तरीय वाटचालीविषयी जाणून घेतले.



**कुलगुरू देवानंद शिंदे यांना निवेदन देताना मेजर डॉ. रूपा शहा. सोबत ब्रिगेडियर अरुण हारगे , कर्नल चंद्रशेखर देशपांडे, डॉ. व्ही.एन. शिंदे.**

शिवाजी विद्यापीठाने चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम (सीबीसीएस) अंतर्गत एनसीसी हा विषय महाविद्यालयीन स्तरावर सुरू केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. एनसीसीच्या ॲक्टिव्हिटीजबाबत आपण व्यक्तिशः जागरूक असून प्रशिक्षण अकादमी सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सकारात्मक विचारविमर्ष करू, असेही त्यांनी सांगितले. यावेळी मेजर डॉ. शहा यांनी एनसीसी प्रशिक्षण अकादमीसंदर्भातील निवेदन कुलगुरू डॉ. शिंदे यांना सादर केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

सकाळ 21 MAY 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एनसीसी प्रशिक्षण अकादमीबाबत सकारात्मक : कुलगुरू डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. २० : एनसीसी प्रशिक्षण अकादमी उभारण्याबाबत शिवाजी विद्यापीठ सकारात्मक असून त्यासाठी आवश्यक कायदेशीर बाबी तपासून अधिकार मंडळासमोर त्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे दिली.


एनसीसीचे महाराष्ट्र राज्याचे उप-महासंचालक ब्रिगेडियर अरुण हारगे (मुंबई), कर्नल चंद्रशेखर देशपांडे, मेजर डॉ. रूपा शहा यांनी आज कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी एनसीसीच्या राज्यस्तरीय वाटचालीविषयी माहिती घेतली. विद्यापीठाने चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम (सीबीसीएस) अंतर्गत एनसीसी हा विषय महाविद्यालयीन स्तरावर सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. एनसीसीच्या ॲक्टिव्हिटीज् बाबत आपण व्यक्तिशः अत्यंत जागरूक असून प्रशिक्षण अकादमी सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सकारात्मक विचारविमर्श करू, असेही त्यांनी सांगितले. मेजर डॉ. शहा यांनी एनसीसी प्रशिक्षण अकादमीसंदर्भातील निवेदन कुलगुरू डॉ. शिंदे यांना सादर केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी 21 MAY 2016

# डॉ. अर्जुन चव्हाण आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी रशियाला रवाना



**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातील प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांची भारत, मॉस्को व ताश्कंद हिंदी आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली असून ते रशियाला रवाना झाले.

'भूमंडलीकरण के दौर में भारतीय, उजबेकी एवं रिशयन भाषा, साहित्य एवं संस्कृती' या विषयावर मॉस्को व ताश्कंद येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या चर्चासत्रात डॉ. चव्हाण यांना सत्राचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व विषयतज्ज्ञ म्हणून निमंत्रित केले आहे.